## प्रकरण चौथे

## "माधवनगर कॉटन मिल्स् - अभ्यासनमुन्यातील कामगारांचे वेतन व उत्पन्नाचा अभ्यास"

## प्रकरण चौथे

## "माधवनगर कॉटन मिल्स् - अभ्यासनमुन्यातील कामगारांचे वेतन व उत्पन्नाचा अभ्यास"

### प्रा स्ता वि क :

भारतीय अर्थव्यवस्थेत उद्योगांचे प्राथमिक क्षेत्रातील, द्वितीय क्षेत्रातील व तृतीय क्षेत्रातील उद्योग अशा प्रकारे वर्गीकरण केलेले आहे. सदर अभ्यासाला निवडलेली माधवनगर कॉटन मिल ही गिरणी द्वितीय क्षेत्रात मोडणारा उद्योग आहे. द्वितीय क्षेत्रालाच औद्योगिक क्षेत्र म्हणून संबोधले जाते. औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटित असल्याने कामगारांच्या वेतन निश्चितीवर त्यांच्या सौदाशक्तीचा प्रभाव पडतो. कामगारांची आर्थिक - सामाजिक स्थिती अभ्यासण्यासाठी कामगारांना मिळणारे वेतन व इतर उत्पन्न समजणे गरजेचे ठरते. कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचे दर अधिक असतील तसेच इतर मार्गांनीही कामगाराला उत्पन्न मिळत असेल तर कामगाराचे एकूण उत्पन्न वाढून कामगाराची आर्थिक स्थिती सुधारते. कामगाराच्या अधिकाधिक गरजा भागून त्याचा व त्याच्या कुटुंबाचा राहणीमानाचा दर्जा सुधारतो. कामगारांची कार्यक्षमता सुधारते. त्याचा इष्ट परिणाम कारखान्याची उत्पादनक्षमता वाढण्यावर होतो. त्यामुळे कामगाराला मिळणारे वेतन व कामगाराला अन्य मार्गांनी मिळणारे उत्पन्न नेमके किती आहे याला अधिक महत्व प्राप्त होते. सदर अभ्यासाचा हेतू माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांचा आर्थिक - सामाजिक सर्वे हा असल्याने कामगारांना मिळणारे वेतन व भत्ते तसेच इतर मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न याबाबतचा अभ्यास सदर प्रकरणात केला आहे.

## १.१ कामगारांच्या नोकरीचा कालखंड :

कामगारांचा वैयक्तिक परिचय या प्रकरणात माधवनगर कॉटन मिल-मधील कामगारांच्या नोकरीच्या कालखंडाचा विस्ताराने अभ्यास केला आहे. नोकरीच्या कालखंडाचा कामगारांच्या कौशल्यावर प्रभाव पडतोच परंतु त्यांच्या आर्थिक स्थितीवरही प्रभाव पडतो. कामगाराचा नोकरीचा कालखंड वाढल्यास कामगाराच्या वेतनातही हळूहळू वाढ होत जाते. एकाच प्रकारच्या कामात नवीन असलेल्या कामगारांना जुन्या कामगारांच्या तुलनेने कमी वेतन मिळते. म्हणजेच कामगाराची आर्थिक - सामाजिक स्थिती त्याच्या नोकरीचा कालखंड किती आहे यावर अवलंबून असते.

सदर गिरणीत ११ ते ३५ वर्षापर्यंत नोकरीत असलेले ३३ निवड कामगारांपैकी ३१ कामगार आहेत. म्हणजेच शेकडा ९४ कामगार हे दीर्घ काळ नोकरी करीत असलेले आहेत. त्यामुळे नोकरीच्या कालावधीवरून कामगारांना मिळणारे वेतन अधिक असणे आवश्यक आहे.

## १.२ कामगारांच्या मासिक वेतनावरून वर्गीकरण :

उत्पादनाच्या घटकांमध्ये श्रम हा मुलभूत व सक्रीय स्वरूपाचा घटक असून ह्या घटकाला उत्पादित वस्तूच्या मूल्यापैकी जो भाग मिळतो त्यालाच मजुरी असे म्हणतात. श्री पी.एच्. स्ट्रेटॉफ यांच्या मते, "मजुरी म्हणजे उपयोगितांची निर्मिती करणाऱ्या श्रमाबद्दल कामगाराला प्राप्त होणारा मोबदला होय." [१] कामगाराला मिळणारे उत्पन्न, त्याचे जीवनमान, समाजातील दर्जा, आणि आर्थिक कल्याण ह्या सर्व गोष्टी प्रामुख्याने त्यांना मिळणाऱ्या मजुरीवर अवलंबून असतात. म्हणूनच कामगाराच्या वेतनाला महत्व प्राप्त

होते. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांची वेतनाची स्थिती पुढील प्रमाणे आढळते.

तक्ता क्र. ४.१

कामगारांच्या मासिक वेतनावरून वर्गीकरण

| मासिक वेतन (रुपये) | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ५०१ ते ८०० | १ | ३.० |
| ८०१ ते ११०० | १ | ३.० |
| ११०१ ते १४०० | ८ | २४.२ |
| १४०१ ते १७०० | १५ | ४५.५ |
| १७०१ ते २००० | ५ | १५.२ |
| २००१ ते २३०० | २ | ६.१ |
| २३०१ ते २६०० | १ | ३.० |
| एकूण .. | ३३ | १००.० |

(माधवनगर कॉटन मिल सांख्यिकी विभाग)

माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या आर्थिक - सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी कामगारांना दरमहा मिळणारा पगार विचारात घेण्यासाठी सदर गिरणीतील सांख्यिकी विभागाकडून कामगारांच्या वेतनाची माहिती मिळविली. योग्य विश्लेषण करता यावे म्हणून जुलै, १९९३ या महिन्यात कामगारांना मिळालेल्या पगाराची आकडेवारी पगार पत्रकावरून मिळविली. सदर माहितीवरून कामगारांच्या वेतनात खूपच तफावत

संदर्भ - १ श्रमाचे अर्थशास्त्र डॉ. प्रभाकर देशमुख, पान नं. ९७.

असल्याचे आढळते. कारण कामगाराचा पगार हा कामगार कामावर हजर असलेल्या दिवसांवर अवलंबून असतो. बरेच कामगार महिन्यातील फक्त ८, १० अगर १५ दिवस हजर असल्याने त्यांना मिळणारा त्या महिन्यातील पगार अत्यल्प असल्याचे आढळले.

वरील तक्ता क्रमांक ४.१ मध्ये माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या आर्थिक - सामाजिक अभ्यासासाठी निवडलेल्या कामगारांच्या मासिक वेतनावरून वर्गीकरण केले आहे. ३३ निवड कामगारांपैकी एका कामगाराचे वेतन ५०१ ते ८०० रु. च्या दरम्यान आहे. म्हणजेच असे वेतन घेणारे गिरणीत शेकडा ३ कामगार आहेत. ८०१ ते ११०० रुपया दरम्यान वेतन मिळणाराही एक कामगार आहे. अशा वेतन मर्यादेचे गिरणीत शेकडा ३ कामगार आहेत. ८ कामगारांचे वेतन ११०१ ते १४०० रुपयाच्या दरम्यान आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.२ आहे. १४०१ ते १७०० रुपये मासिक वेतन घेणारे १५ कामगार आहेत. या वेतनाचे सर्वाधिक निवड कामगार आहेत. गिरणीतील शेकडा ४५.५ कामगार १४०१ ते १७०० रुपये पर्यंत वेतन घेतात. ५ कामगार १७०१ ते २००० रुपयापर्यंत वेतन घेतात. असे वेतन घेणारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. २ कामगार २००१ ते २३०० रुपयापर्यंत वेतन घेतात. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. तर एकच कामगार २३०१ ते २६०० रु. वेतन घेतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे.

म्हणजेच सदर गिरणीतील कामगारांना २६०० रु. पेक्षा जास्त वेतन मिळत नसल्याचे दिसते. गिरणीतील शेकडा ९१ कामगारांना २०००/- रु. पेक्षा कमी वेतन मिळते. तर फक्त शेकडा ९ कामगारांना २०००/- रु.

पेक्षा जास्त आणि २६००/- रु. पेक्षा कमी वेतन मिळते. सदर गिरणीत १० वर्षापेक्षा अधिक वर्षे म्हणजे ३५ वर्षापर्यंत नोकरी करणारे शेकडा ९४ कामगार असूनही कामगारांना मिळणारे वेतन मात्र अल्प आहे. कामगारांची वारंवारची गैरहजेरीही याला काही अंशी जबाबदार आहे. परंतु तरीही वाढती महागाई आणि अल्प पगार यामुळे कौटुंबिक खर्चाचा ताळमेळ घालून राहणीमान टिकविणे अशक्य होते.

## १.३ निवड कामगारांना मिळणाऱ्या बोनसच्या रकमेनुसार वर्गीकरण :

अधिलाभांश किंवा बोनस ही रक्कम कामगारांना त्यांच्या मजुरीशिवाय अधिक कार्यक्षमतेने काम करण्यासाठी प्रेरित करण्याच्या उद्देशाने दिलेली असते. आर्थिक परिस्थिती सदृढ असून सुध्दा आपल्या असमर्थतेची ढाल समोर करुन उद्योगपती कामगारांना योग्य जीवनमान जगण्याकरिता आवश्यक असलेल्या मजुरीचे शोधन करण्याचे टाळतात, म्हणून कामगारांना बोनसच्या स्वरुपात मोबदला देणे योग्य ठरते. १९६१ च्या बोनस आयोगाच्या मते, कामगारांचे परिश्रम, त्यांचे मनोबल व सहकार्य हे कारखान्याच्या समृध्दीला कारणीभूत ठरते. कारखान्याच्या समृध्दीमधून कामगाराला दिला जाणारा वाटा म्हणजे बोनस होय. [२] कामगारांना आपल्या नित्त्याच्या उत्पन्नातून ज्या उपभोग्य वस्तुंची खरेदी करणे अशक्य होते अशा वस्तूंची खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेली क्रयशक्ती प्राप्त व्हावी या दृष्टीने भारतात १९६५ रोजी बोनस कायदा पास करुन त्याची कार्यवाही करण्यास कारखानदारांवर सक्ती केली आहे. बोनस कायद्यानुसार २५००/- रु. पर्यंत वेतन मिळणाऱ्या कामगारांना ८.३३ टक्के दराने दरवर्षी बोनस दिला जातो. माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांना वेतनाशिवाय दरवर्षी बोनसची रक्कम मिळत असल्याने त्यांच्या उत्पन्न वाढीस मदत होते.

---

संदर्भ २ - श्रमाचे अर्थशास्त्र, प्रभाकर देशमुख, पृ. क्र. १८

तक्ता क्र. ४.२

कामगारांच्या बोनसच्या रकमेवरुन वर्गीकरण

| बोनसची रक्कम (रुपये) | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ७०१ ते ८०० | १ | ३.० |
| ८०१ ते ९०० | १ | ३.० |
| ९०१ ते १००० | २ | ६.१ |
| १००१ ते ११०० | १ | ३.० |
| ११०१ ते १२०० | ५ | १५.२ |
| १२०१ ते १३०० | ७ | २१.२ |
| १३०१ ते १४०० | ८ | २४.२ |
| १४०१ ते १५०० | ३ | ९.१ |
| १५०१ ते १६०० | ५ | १५.२ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

(माधवनगर कॉटन मिल सांख्यिकी विभाग)

सदर अभ्यासाच्या दृष्टीने मिलच्या सांख्यिकी विभागाकडून निवड कामगारांना १९९२ साली मिळालेल्या बोनसच्या रकमा मिळविल्या. तक्ता क्र.४.२ वरुन कामगारांच्या बोनसच्या रक्कमांमध्ये चढउतार आढळतो. सदर गिरणीतील कामगारांना मिळणारा बोनस ७०१ रु. ते १६०० रु या मर्यादेत असल्याचा दिसतो. ७०१ ते ८०० रु. आणि ८०१ ते ९०० रु. बोनस मिळणारा ३३ पैकी प्रत्येकी १ - १ निवड कामगार आहे. म्हणजेच गिरणीतील शेकडा ३ कामगारांना ७०१ ते ८०० इतका तर शेकडा ३ कामगारांना ८०१ ते ९०० रु. इतका बोनस मिळतो. २ कामगारांना ९०१ ते १००० इतका बोनस मिळतो. इतका

बोनस मिळणाऱ्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. एका कामगाराला १००१ ते ११०० रु. बोनस मिळतो. म्हणजेच गिरणीतील शेकडा ३ कामगारांना तितका बोनस मिळतो. ५ कामगारांना ११०१ ते १२०० रु. बोनस मिळतो. इतका बोनस मिळणाऱ्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. ७ कामगारांना १२०१ ते १३०० रु. इतका बोनस मिळतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २१.२ आहे. ८ कामगारांना १३०१ ते १४०० रु. बोनस मिळतो. इतका बोनस मिळणाऱ्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.२ आहे. ३ कामगारांना १४०१ ते १५०० रु. बोनस मिळतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर ५ कामगारांना १५०१ ते १६०० रु. बोनस मिळतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे.

गिरणीतील २८ कामगारांना ११०१ ते १६०० रु. पर्यंत बोनस मिळतो. म्हणजेच गिरणीतील शेकडा ८४.८ कामगारांना इतका बोनस मिळतो. सदर गिरणीतील कामगार गैरहजेरीचे प्रमाण अधिक असल्याने कामाचे हजर दिवस कमी, मासिक वेतन कमी, वार्षिक वेतन कमी त्यामुळे मिळणारा बोनस कमी मिळतो.

१.४ इतर पुरक उत्पन्नानुसार वर्गीकरण :

कामगारांना वेतनाव्यतिरिक्त इतर अन्य मार्गांनी उत्पन्न मिळते का ? याचाही विचार कामगारांच्या आर्थिक - सामाजिक स्थितीचा अभ्यास करताना करणे गरजेचे ठरते. शेती, घरभाडे, दुग्धशेती, व्यापार अशा मार्गांनी कामगाराला उत्पन्न मिळत असेल तर त्याचे एकूण उत्पन्न वाढून राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. कामगाराच्या आर्थिक - सामाजिक स्थितीवर त्याचा इष्ट परिणाम होतो. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांना इतर

अन्य मार्गांनी उत्पन्न मिळते का याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने पुढील स्वरूपाची माहिती मिळविली.

तक्ता क्र. ४.३

इतर पूरक उत्पन्नाचा मार्ग

| इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग असणारे | २३ | ६९.७ |
| इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग नसणारे | १० | ३०.३ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

वरील तक्ता क्र. ४.३ वरून मुलाखतीसाठी निवडलेल्या ३३ कामगारांपैकी २३ कामगारांना इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग आहे. मुलाखत पत्रिकेनुसार या २३ कामगारांना वेतनाशिवाय शेती, दुग्धशेती, घरभाडे, व्यापार, शेत-मजुरी अशा काही अन्य मार्गांनी काही प्रमाणात का होईना उत्पन्न मिळते. म्हणजेच गिरणीतील शेकडा ६९.७ कामगारांना इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग आहे. निवड कामगारांपैकी १० कामगारांना वेतनाशिवाय अन्य कोणत्याही मार्गांनी उत्पन्न मिळत नाही. म्हणजेच गिरणीतील शेकडा ३०.३ कामगारांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पूर्णपणे पगारावर अवलंबून राहावे लागते. अन्य कोणत्याही मार्गांनी पुरक उत्पन्न मिळत नाही.

तक्ता क्र. ४.४

इतर पुरक उत्पन्नाच्या मार्गानुसार वर्गीकरण

| इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- |
| शेती | ८ | ३४.८ |
| दुग्धशेती | ३ | १३.० |
| कुक्कुटपालन | - | - |
| घरभाडे | २ | ८.७ |
| व्यापार | ३ | १३.० |
| शेतमजुरी | ३ | १३.१ |
| इतर | ४ | १७.४ |
| एकूण .. | २३ | १००.० |

तक्ता क्र. ४.४ वरुन निवड कामगारांपैकी २३ कामगारांनाच इतर उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध आहे. २३ कामगारांपैकी ८ कामगारांना शेती हा इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग आहे. हा मार्ग असलेल्या गिरणीतील कामगारांचे शेकडा प्रमाण ३४.८ आहे. इतर पुरक उत्पन्नात शेती हा मार्ग असलेलेच सर्वाधिक कामगार आहेत. ३ कामगारांना दुग्धशेती हा इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १३ आहे. २ कामगारांना घरभाडे हा पुरक उत्पन्नाचा मार्ग आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ८.७ आहे, ३ कामगारांना व्यापार हा पुरक उत्पन्नाचा मार्ग आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १३.० आहे. ३ कामगारांना शेतमजुरी हा मार्ग आहे. असेही शेकडा १३ कामगार आहेत. तर ४ कामगारांना इतर मार्गांनी पुरक उत्पन्न मिळते अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १७.४ आहे.

अर्थात सदर कामगारांच्या मते, जरी हा उत्पन्नाचा मार्ग असला तरी शेती कोरडवाहू असल्याने, पाऊस अनिश्चित असल्याने शेतीपासून फारसे उत्पन्न मिळतच नाही. दुग्धशेती ही मोठया प्रमाणावर केली जात नाही. घरगुती जनावरे १/२ आहेत. मोठा धंदा म्हणून हे उत्पन्नाचे मार्ग नसले तरी कामगाराला आर्थिक हातभार लावण्यास ते महत्वाचे ठरतात.

तक्ता क्र.४.५

इतर पुरक मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नानुसार वर्गीकरण

| इतर पूरक मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न (रुपये) | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| उत्पन्न न मिळणारे | १० | ३०.३ |
| ० ते १००० | २ | ६.१ |
| १००१ ते २००० | ४ | १२.१ |
| २००१ ते ३००० | २ | ६.१ |
| ३००१ ते ४००० | ६ | १८.२ |
| ४००१ ते ५००० | ४ | १२.१ |
| ५००१ ते ६००० | ३ | ९.१ |
| ६००० वरील | २ | ६.० |
| एकूण .. | ३३ | १००.० |

तक्ता क्र. ४.४ वरुन कामगारांना वेतनाशिवाय शेती, व्यापार, दुग्धशेती, घरभाडे अशा अन्य मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाची कल्पना येते.

३३ निवड कामगारांपैकी १० कामगारांना इतर पुरक उत्पन्नाचा मार्ग नसल्याने इतर पुरक मार्गांनी उत्पन्न मिळत नाही. सदर गिरणीत असे शेकडा ३०.३ कामगार आहेत. वार्षिक १००० रु. पर्यंत इतर उत्पन्न मिळणारे २ कामगार आहेत, गिरणीतील त्यांचे शेकडा प्रमाण ६.१ आहे. १००१ ते २००० रु.पर्यंत उत्पन्न मिळणारे ४ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १२.१ आहे. २००१ ते ३००० रुपयापर्यंत उत्पन्न मिळणारे २ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. ३००१ ते ४००० रु. उत्पन्न मिळणारे ६ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. ४००१ ते ५००० रु. पर्यंत उत्पन्न मिळणारे ४ कामगार असून गिरणीतील त्यांचे शेकडा प्रमाण १२.१ आहे. ५००१ ते ६००० रुपयापर्यंत उत्पन्न मिळणारे ३ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर ६००० रुपयापेक्षा जास्त उत्पन्न मिळणारे २ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.० आहे.

## १.५ एकूण उत्पन्नानुसार वर्गीकरण :

कामगारांना दरमहा वेतनाच्या स्वरुपात उत्पन्न मिळते. त्याशिवाय दरवर्षी मिळणारा बोनस आणि इतर मार्गांनी मिळणारे पुरक उत्पन्न या सर्वांचा एकत्रित विचार करुन कामगारांचे वार्षिक उत्पन्न काढल्यास त्यांच्या एकूण उत्पन्नाची कल्पना येते. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांना मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करण्यासाठी निवड कामगारांना मिळणारे वार्षिक वेतन उत्पन्न, बोनस व इतर पुरक उत्पन्न यावरुन त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न काढले. त्याचे वर्गीकरण -

तक्ता क्र. ४.६

कामगारांच्या एकूण वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

| एकूण वार्षिक उत्पन्न (रुपये) | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ५००१ ते १०,००० | १ | ३.० |
| १०,००१ ते १५,००० | - | - |
| १५,००१ ते २०,००० | ७ | २१.२ |
| २०,००१ ते २५,००० | ७ | २१.२ |
| २५,००१ ते ३०,००० | १३ | ३९.४ |
| ३०,००१ वरील | ५ | १५.२ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

तक्ता क्र. ४.५ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील ३३ निवड कामगारांच्या एकूण वार्षिक उत्पन्नाची कल्पना येते. निवड कामगारांपैकी एका कामगाराचे वार्षिक उत्पन्न ५००१ ते १०,००० रुपये या मर्यादेत आहे. असे उत्पन्न गिरणीतील शेकडा ३ कामगारांच्यात असल्याचे दिसते. १०,००१ ते १५,००० या उत्पन्न गटात एकही कामगार नाही. १५,००१ ते २०,००० रुपये या उत्पन्न गटात ७ कामगार असून गिरणीत या गटातील कामगारांचे शेकडा प्रमाण २१.२ आहे. २०,००१ ते २५,००० रु. या उत्पन्न गटात ७ कामगार आहेत. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २१.२ आहे. २५,००१ ते ३०,००० रु. या उत्पन्न गटात १३ कामगार आहेत. अशा गटातील कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३९.४ आहे. तर ३०,००० रु. पेक्षा जास्त उत्पन्न असलेले

५ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. ३०,००० रु. पेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या ५ कामगारांपैकी ४ कामगार एकत्रित कुटुंबातील आहेत.

## १.६ वेतन देण्याची पध्दती :

कामगारांचा आर्थिक – सामाजिक अभ्यास करताना कामगारांचे वेतन हा घटक सर्वाधिक महत्वाचा मानला जातो. वेतन पुरेसे, वेळेवर मिळत असेल तरच कामगार आपल्या कौटुंबिक गरजा वेळच्या वेळी भागवू शकतात. कामगाराला दररोज, दर आठवडयाला, दर महिन्याला अगर दर वर्षाला यापैकी कोणत्या पध्दतीने वेतन मिळते यावर कामगाराचा राहणीमानाचा दर्जा अवलंबून असतो. दररोज अगर दर आठवडयाला वेतन मिळत असल्यास हा अगदी अल्प काळ असतो. जसे येईल तसे ते उत्पन्न खर्च होऊन जाते. फार लांबचा विचार करून योग्य प्रकारे, योग्य कारणासाठी खर्च करण्याची सवय लागत नाही. दरवर्षाला वेतन मिळत असल्यास, हा कालावधी इतका दीर्घ असतो की, गरजा भागविण्यास दीर्घ-काळ प्रतिक्षा करावी लागते. सर्वात सोयीची वेतन पध्दती दरमहा वेतन पध्दती ही होय.

सदर गिरणीतील कामगारांना मासिक वेतन दिले जाते. दरमहा वेतन मिळत असल्याने कामगारांना आपल्या खर्चाबद्दल जागरूक राहून खर्चाचे आणि मिळणाऱ्या उत्पन्नाचे योग्य नियोजन करणे शक्य होते.

## १.७ जादा कामाचा मोबदला :

नेहमीच्या ८ तासाच्या डयुटीपेक्षा जर जादा वेळ कामगाराला काम करावे लागले तर अशा जादा कामाचा त्याला मोबदला दिला जातो. सदर गिरणीतील कामगारांनाही जादा कामाचा मोबदला दिला जातो. मात्र

सदर गिरणीत कामगार भरती जवळ-जवळ बंदच आहे. कर्जाचा वाढता पसारा, त्यामुळे कच्च्या मालाची टंचाई यामुळे उपलब्ध कामगारांना ब-याचदा नुसतेच बसवून ठेवले जाते. त्यामुळे जादा कामाचा प्रश्नच येत नाही.

गिरणीत जेव्हा भरपूर कच्चा माल उपलब्ध असतो, तेव्हा गिरणीतील उपलब्ध साधनसामग्री पूर्ण कार्यक्षमतेने वापरण्यावर भर दिला जातो. अशा वेळी जादा काम उपलब्ध असल्यास ते अस्तित्वातील कामगारांकडून करुन घेतले जाते. जादा कामाचा मोबदला म्हणून अशा वेळी कामगाराला दिवसाला दिल्या जाणा-या मजुरीवरुन ताशी दर काढून मोबदला दिला जातो. मात्र सदर गिरणीत अलिकडे कायम कामगारांनाच पुरेसे काम नाही, बदली कामगारांना घरी पाठविले जाते. त्यामुळे जादा कामाच्या मोबदल्याचा प्रश्नच येत नाही.

......